वाचले :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१
२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब,माघ२९,शके १९४१ दि.१८/२/२०२०
३. पत्र क्र.प्रशा/७/कावि/५५९/२०२० दिनांक २० ऑगस्ट, २०२०
४. क्रमांक : पीसीसी-२०२०/प्र.क्र.१७/नवि-२२ दिनांक २३ सप्टेंबर, २०२४
५. आदेश क्र.सा.प्र.वि/२/कावि/६४८/२०२४ दिनांक ०३/१०/२०२४
६. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत
७. मा.प्रशासक यांचेकडील मा.महापालिका सभा ठराव क्र. ७५४ दि. ०८/१०/२०२४
८. मा.आयुक्त सो यांचा दि. ०८/१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/६७१/२०२४
दिनांक ०८/१०/२०२४

**विषय :- 'कार्यकारी अभियंता(पर्यावरण)' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'कार्यकारी अभियंता (पर्यावरण)'** अभिनामाचे १ पद **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर आहेत. **'कार्यकारी अभियंता (पर्यावरण)'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६, पदोन्नतीने नेमणूक करणे मधील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग -१ ची पदे पदोन्नतीने भरतांना, त्यांस शासनाची पुर्वमंजूरी आवश्यक राहील अशी अट नमुद आहे. सदरची अट शिथिल करण्याकामी उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये शासनास कळविण्यात आलेले आहे. परंतु महापालिका प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने व विभागाची आवश्यकता विचारात घेता **कार्यकारी अभियंता (पर्यावरण)** पद सद्यस्थितीत रिक्त ठेवणे योग्य नाही. यास्तव दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या पदोन्नती समितीने खालील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

१. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजीचे पत्रान्वये श्री.सोहन निकम मधुकर, उपअभियंता (स्थापत्य) यांची सेवा पदोन्नतीच्या दिनांकापासून उपअभियंता (पर्यावरण) या पदावर समावेशन करण्यास एकवेळची बाब म्हणून मान्यता दिलेलेली आहे.

   उपरोक्त प्राप्त शासन मान्यतेनुसार दिनांक ०३/१०/२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्री.निकम सोहन मधुकर यांची उपअभियंता (स्थापत्य) पदावरील सेवा दिनांक ०३/०६/२०२० पासून उपअभियंता(पर्यावरण) या पदावर समावेशनाने वर्ग करण्यात आलेली आहे. त्यानुसार श्री.निकम सोहन मधुकर हे उपअभियंता (पर्यावरण) पदासाठी आवश्यक किमान ३ वर्षाच्या अनुभवाची अट पुर्ण करित आहे.

२. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार तसेच महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजीचे पत्रातील निर्देश विचारात घेता, कार्यकारी अभियंता (पर्यावरण) अभिनामाचे पदोन्नतीकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार खालील अधिकारी यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णय तसेच मे.उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्रमांक २१४५/२००५ मधील निर्णयाच्या अधिन राहून मा.महापालिका सभेच्या मान्यतेने **'कार्यकारी अभियंता (पर्यावरण)'** अभिनामाच्या रिक्त पदावर पे.लेवल पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७०० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केलेली आहे.

| अ.क्र | अधिकारी नावं | पदोन्नतीचा प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | निकम सोहन मधुकर | ज्येष्ठतेनुसार |

मा.महापालिका सभेच्या आधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी ठराव क्र. ७५४, दि.०८/१०/२०२४ अन्वये उपरोक्त अधिकारी यांना 'कार्यकारी अभियंता (पर्यावरण)' पदावर पदोन्नती देण्यास मान्यता दिलेली आहे.

सबब, उपरोक्त नमूद बाबी विचारात घेता, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त नमुद अधिकारी यांना शासनाने मान्यता देण्याच्या अधिन राहून **कार्यकारी अभियंता(पर्यावरण)** अभिनामाचे पदावर **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीमध्ये ज्येष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आदेशाच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. उपरोक्त नमूद अधिकारी यांना पर्यावरण अभियांत्रिकी विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
*(शेखर सिंह)*
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित
प्रत-

१) लेखा विभाग    २) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग    ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

सहाय्यक आयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,